कुलसचिव

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२

## परिपत्रक

जा.क्र. साप्रवि/जमिन/ई-पीकपाहाणी/१९४९/२०२५

दिनांक : २० सप्टेंबर, २०२५/1949

शासनाने पीक पेरणीची माहिती भ्रमणध्वनीवरील ॲप व्दारा (Mobile App) 7/12 उतारा मधील गा.न.नं. १२ मध्ये नोंदविण्यासाठी स्वत: शेतकऱ्यांनी उपलब्ध करुन देण्याचा "ई-पीक पाहाणी" कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय महसुल अधिकारी व प्राधिकारी यांना दिशानिर्देश देणेबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. खरीप हंगाम २०२५ मध्ये असलेल्या पीकांची नोंद करणेबाबत महसुल विभागाचे / शासनाचे निर्देश आहेत. त्याअनुषंगाने सर्व महसुल मंडळाव्दारे ई-पीक पाहाणी मोबाईल ॲपव्दारे सादर करणेबाबत सुचित केलेले आहे.

या परिपत्रकाव्दारे सर्व (संबंधित) विभाग प्रमुख/ प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय/ कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र/ प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र/ सहयोगी अधिष्ठाता व इतर संबंधित अधिकारी यांना कळविण्यात येते की, शासन निर्देशानुसार विद्यापीठाच्या खरीप हंगाम २०२५ मध्ये असलेल्या पीकांची मोबाईल ॲपव्दारे पीक पेरणी अहवालामध्ये 7/12 उतारा मधील (गा.न.नं. १२ मध्ये) नोंदणी करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. सदर नोंद करणेबाबतची मुदत ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत आहे.

याप्रकरणी काही अडचण असल्यास संबंधित तलाठी यांचेशी संपर्क साधावा.

स्वाक्षरीत/-<br>
कुलसचिव<br>
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलीपी आवश्यक कार्यवाहीकरीता :

१) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ----------------------------------------------------------------------------------------
२) संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, अकोला/ मुख्य बिजोत्पादन अधिकारी, म.प्रा.प्र., वणी रंभापूर
३) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र (सर्व) ----------------------------------
४) विभाग प्रमुख, कृषि विद्या, उद्यानविद्या, पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विभाग ----------------------------
५) प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय (सर्व) ----------------------------------------------------------------
६) कार्यक्रम समन्वयक (सर्व) ----------------------------------------------------------------------------
७) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell), यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

प्रत माहितीकरीता सादर :

१) मा. संशोधन संचालक / अधिष्ठाता (कृषि) / संचालक, विस्तार शिक्षण /अधिष्ठाता (कृषि अभियांत्रिकी) / अधिष्ठाता (उद्यानविद्या) / नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

२) मा. कुलगुरू यांचे स्विय सहायक यांना मा. कुलगुरू महोदय यांचे माहितीकरीता सादर.

उपकुलसचिव (सामान्य प्रशासन)<br>
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

481

A) Land N (New 2023)